# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर - वसई-विरार
यांचे कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व,
जि. ठाणे दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


प्रेस नोट :- ४१५/२०२३ दिनांक – ०४/१२/२०२३

## दुचाकी वाहने चोरी करणाऱ्या आरोपीतांना अटक
## विरार पोलीस ठाणे - गुन्हे प्रकटीकरण पथकाची कामगीरी.

विरार पोलीस ठाणे हद्दीत दि.२१/११/२०२३ रोजी सायंकाळी ०४.३०वा. ते ०५.००वा.चे दरम्यान रुम नं.०२ चे समोर, येसुबाई जनार्दन मिस्त्री चाळ, विर सावरकर मार्ग, विरार(पु.), ता.वसई, येथे फिर्यादी यानी त्यांची बजाज कंपनीची पल्सर-२०० एन.एस. मोटर सायकल क्रं.एम.एच.०४/एफ.एन.९०५८ ही उभी करुन ठेवलेली असतांना, कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरी करुन चोरुन नेले बाबत फिर्यादी श्री.हर्षल राजेश तरे, वय-२७ वर्षे, रा.येसुबाई जनार्दन मिस्त्री चाळ, विर सावरकर मार्ग, विरार(पु.), यांनी दिलेल्या तक्रारीवरुन अज्ञात आरोपीतावर विरार पो.स्टे. गु.रजि.नं. १०८०/२०२३, भा.दं.वि.सं.कलम-३७९ प्रमाणे दि.२२/११/२०२३ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला.

वर नमुद गुन्हयाचे अनुषंगाने विरार गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी तात्काळ गुन्हयाचे घटनास्थळावरील सीसीटीव्ही फुटेज व गुप्त बातमीदार यांचेमार्फत मिळालेल्या माहीतीच्या आधारे आरोपीत नामे. **१)स्वस्तिक सिंग, वय-२१ वर्षे, २)अखिल शेख, वय-२१ वर्षे, ३)आशिष लक्ष्मण जाधव** सर्व रा.विरार(पु.), ता.वसई, यांस दि.२९/११/२०२३ रोजी ताब्यात घेवुन त्यांचेकडे तपास केला असता त्यांचा सदर गुन्हातील सहभाग निष्पन्न करुन त्यांना सदर अटक केली करण्यात आली आहे. अटक आरोपीतांकडे अधिक तपास केला असता, त्यांचेकडून एकुण ०२ पल्सर मोटार सायकल **हस्तगत** करण्यात आल्या आहेत.तसेच आरोपीत यांनी वसई पोलीस ठाणेच्या हद्ददीत एक घरफोडीचा गुन्हा केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

**- उघडकीस आलेले गुन्हे -**

| अ.क्रं. | पोलीस ठाणे | गु.रजि.नं. व कायदा कलम |
|---|---|---|
| १ | विरार | १०८०/२०२३,भा.दं.वि.सं.कलम-३७९,३४ प्रमाणे **(मुळ गुन्हा)** |
| २ | वसई | ३६५/२०२३, भा.दं.वि.सं. कलम-४५४,३८०,३४ प्रमाणे |
| ३ | बोईसर एम.आ.डी.सी., जि.पालघर. | ४८६/२०२३, भा.दं.वि.सं. कलम- ३७९, ३४ प्रमाणे |

सदरची कामगिरी श्री.सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त सो, परिमंडळ-३, विरार, श्री.रामचंद्र देशमुख, सहायक पोलीस आयुक्त सो, विरार विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली विरार पोलीस ठाणेचे श्री.राजेंद्र कांबळे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सो, श्री.अभिजित मडके, पोलीस निरीक्षक (गुन्हे), व गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पो.उप.निरी. ज्ञानेश्वर कोकाटे, पो.हवा. सचिन लोखंडे, संदिप जाधव, विशाल लोहार, इंद्रनिल पाटील, संदिप शेरमाळे, पो.अं.संदिप शेळके, सचिन बळीद, बालाजी गायकवाड, रोशन पुरकर, दत्तात्रय जाधव, प्रफुल सोनार यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.

**----0000----**